कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/रा.म.भ स्प./२०२६-२७/९८२
दि. ३१/०७/ २०२६

## कृपया प्रसिध्दीसाठी

**कला अकादमीची बाल कलाकार राज्यस्तरीय भजन स्पर्धा दि.८ ऑगस्ट रोजी**

कला अकादमी आयोजित पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती बाल कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा शनिवार दि.८ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २.३० वाजल्यापासून रविंद्र भवन, साखळी येथे निश्चित करण्यात आली असून यात विभागीय स्पर्धेतील चार केंद्रावरुन निवडण्यात आलेली एकूण आठ पथके सहभागी होणार आहेत.

**त्यात श्री राम सेवा संघ बाल भजनी मंडळ, मयडे-बार्देश, श्री साई दिंगबर बाल भजनी मंडळ, आसगांव-बार्देश, श्री शांतादुर्गा हायस्कूल बाल भजनी मंडळ, डिचोली, सरकारी माद्यमिक विद्यालय, तारमाथा भिले, सुर्ला-डिचोली, श्री शांतादुर्गा भजनी मंडळ, बांदोडा-फोंडा, श्री सातेरी प्रासादिक संगीत संस्था, बेतोडा-फोंडा, श्रीकृष्ण नागझरकर बाल भजनी मंडळ, भोमा-फोंडा व श्री दामोदर विद्यालय, लोलये-काणकोण या पथकांचा समावेश आहे.**

राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणा-या आठही पथकानी आपल्या सर्व सहकलाकारासह पुर्वतयारीनिशी ८ ऑगस्ट २०२६ रोजी सादरीकरणाच्या किमान १ तास अगोदर रविंद्र भवन, साखळी येथे उपस्थित राहाणे आवश्यक आहे. सर्व पथकप्रमुखांच्या उपस्थितीत स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम चिठ्ठ्या टाकून ठरविला जाईल व तो सर्वावर बंधनकारक राहील. त्यामुळे अंतिम स्पर्धेत सहभागी होणा-या आठही पथकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहाणे अनिवार्य आहे.

शनिवार दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी पुरुष कलाकार स्पर्धेला जोडून सायंकाळी विभागीय व राज्यस्तरीय बाल व महिला कलाकार भजन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. याची सर्व विजेत्या पथकांनी व कलाकारांनी नोंद घ्यावी.

सदर भजन स्पर्धा सर्वांसाठी खुली असून भजनप्रेमी रसिकांनी आपली उपस्थिती लावून स्पर्धेतील सादरीकरण करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. संजीव ना. झर्मेकर)
कार्यक्रम अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता,
८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)